Impact Factor – 6.261 | Special Issue - 162 C | Mar. 2019 | ISSN – 2348-7143
UGC Approved Journal List No. 40705

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-Research Journal**

# WOMEN EMPOWERMENT AND SCIENTIFIC CHANGE

- EXECUTIVE EDITOR OF THIS ISSUE -
**Dinesh R. Jaronde**

- CHIEF EDITOR -
**Dr. Dhanraj T. Dhangar**

Adarsh Arts & Commerce College (Desaiganj)

PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist. Gadchiroli

Printed By : **PRASHANT PUBLICATIONS, JALGAON**

For Details Visit To : www.researchjourney.net

**RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal** ISSN : 2348-7143
*Impact Factor (SJIF) - 6.261* | *Special Issue 162-C :* Women Empowerment & Scientific Change March 2019

४५. भारतीय स्त्रीयांच्या सक्षमीकरणात संविधानाचे योगदान ........ १३२
प्रा.मनोज सोनटक्के, प्रा.डॉ.मिलिंद भगत

४६. सक्षम महिला आणि राजकारण ........ १३५
प्रा. डॉ. विठ्ठल गो. चव्हाण

४७. महिलांचे आर्थिक सबलीकरण एक विवेचन ........ १३७
प्रा. डॉ.अपर्णा अ. पाटील

४८. मानवी अधिकार व महिला ........ १३९
डॉ. विजय टोंगे

४९. स्त्री सक्षमीकरणाचा ऐतिहासिक आढावा ........ १४१
कु. प्रिया प्रकाशराव इंझळकर

५०. ग्रामिण महिला व सक्षमिकरण क्षेत्रे ........ १४४
प्रा. डॉ. दिवाकर एन. कामडी

५१. महिला आरोग्य प्रबोधन ही काळाची गरज ........ १४७
प्रा.डॉ.अर्चना आ. निखाडे

५२. आधुनिक भारतातील एक महान सेवाव्रती : साधनाताई आमटे ........ १४९
प्रा. डॉ. लखपती वा. गायकवाड

५३. स्त्रियांचे बदलते सामाजिक, राजकीय व कौटुंबिक स्वरूप ........ १५१
डॉ. सौ. एम. आर. वलीवकर

५४. कायद्यातील तरतुदी व महिला सक्षमिकरण ........ १५३
डॉ.बी.व्ही.डोंगरे (पाटील)

५५. नैतीकता आणि महिला सशक्तीकरण ........ १५६
डॉ. मोहन दे. वानखडे

५६. महाराष्ट्राच्या राजकारणातील महिलांचा सहभाग ........ १५९
डॉ. किशोर उत्तमराव राऊत

५७. महिला व राजकारण ........ १६२
प्रा. सौ. रायठक दिपमाला विश्वनाथ

५८. कौटुंबिक कलह सोडविण्यांत महिला तक्रार निवारण केंद्राची भूमिका ........ १६४
प्रा. डॉ. साधना डी. वाघाडे

५९. महिलांचे राजकारणात सहभाग ........ १६६
प्रा. डॉ. सुधाकर जावळे

६०. आंबेडकरी विचारदृष्टी आणि स्त्री मुक्ती ........ १६९
प्रा.डॉ. युवराज श्रीराम मानकर

६१. महिला सक्षमिकरण व कौटुंबिक हिंसाचार ........ १७३
प्रा. राजु दयारामजी चावके

६२. अहिंसा : गांधीचींचा विचार आशय ........ १७५
डॉ. माधव लक्ष्मणराव सोनेकर

६३. संत नरहरी सोनार ........ १७८
प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे

६४. महिला सबलीकरण एक आव्हान ........ १८१
प्रा. डॉ. दीपक आनंदराव चौरपगार

६५. महात्मा फुले यांचे शैक्षणिक विचार ........ १८३
प्रा.डॉ. गजानन रा. लोहवे

६६. ग्रामीण पर्यटन : संधी व आव्हाने ........ १८६
प्रा. निलेश दे. हलामी

६७. भारतीय अर्थव्यवस्थेवर काळया पैशाचा प्रभाव ........ १८८
प्रा.डॉ. जयेश मो. अवथरे

६८. बालकांचे हक्क आणि भीक मागणारी रस्त्यावरील मुले ........ १९१
निलेश रामराव मगर



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli

# सक्षम महिला आणि राजकारण

प्रा. डॉ. विठ्ठल गो. चव्हाण
आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज (वडसा), जि.गडचिरोली.

**प्रस्तावना :**

प्राचीन काळापासून आजपर्यंत स्त्रियांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीत बरेच बदल होत आहेत. पुरूष प्रधान संस्कृतीने स्त्रीला आई, पत्नी, मुलगी या नात्यातून पुरूषाचा राग शमविण्याचे एक साधन मानले आहे. स्त्रीने पुरूषाची बरोबरी करणे हा गुन्हा आहे. लागोपाठ मुलीना जन्म देणारी स्त्री दोषी आहे. अशा समाजप्रवृत्तीने स्त्रीचे माणूसपण नाकारले होते. तिला समाजात योग्य स्थान मिळवून देण्यासाठी स्त्री शिक्षणाला चालना मिळाली पाहिजे, असा सर्व समाजसुधारकांचा आग्रह होता. महिला सक्षम किंवा सबळ होणे काळाची गरज आहे. म्हणून महात्मा जोतिबा फुलेनी महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाचा प्रारंभ केला. महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी स्त्रियांसाठी वेगळे विद्यापीठ काढले. कारण प्रत्येक समाज स्त्री आणि पुरूष या दोन्ही घटकांनी मिळून बनलेला आहे. स्त्री शिवाय पुरूषांची आणि पुरूषा शिवाय स्त्रीची कल्पना करणे शक्य नाही. म्हणून हे दोन्ही घटक परस्पर संबंधीत आहे. म्हणजेच स्त्री -पुरूष एका नाण्यांच्या दोन बाजू आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळून ७२ वर्ष पूर्ण झाले असले आणि भारतीय संविधानाने स्त्री-पुरूष समानता मान्य केली असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात स्त्री पुरूषात समानता दिसून येत नाही. आजही महीलांना दुय्यम मानले जाते. म्हणून या दुर्बल घटकाला समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकिय क्षेतात स्थान प्राप्त करावयाचे असेल, तर महिलांचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. त्याशिवाय 'स्त्री पुरूष समानता' हे मुल्य समाजात रूढ होत आहे, असे म्हणता येणार नाही.

महिला सबलीकरणाचा प्रश्न फक्त भारतात आहे, असे नाही. पुर्वी पाश्चीमात्य राष्ट्रात सुध्दा महीलांना पुरूषांच्या बरोबरीची वागणूक मिळत नव्हती. काही काळापर्यंत अमेरिका सारख्या प्रगत राष्ट्रात महीलांना मतदानाच्या मुलभूत अधिकारापासून वंचित ठेवण्यात आले होते. भारतात स्त्री-पुरूष समानता यावी, म्हणून अनेक समाज सुधारकांनी प्रयत्न केले. यामध्ये राजाराम मोहन रॉय, महर्षी कर्वे, क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादीना स्थान दिला जातो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या देशाची राज्य घटना तयार करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. भारतात आंबेडकरांनी हिंदू कोड बिल तयार करून स्त्री स्वातंत्र्याचा पाया रोवला. एवढे नव्हे तर भारताची राज्य घटना तयार करून स्त्री पुरूषात समानता आणण्याचा प्रयत्न सुध्दा केला आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली राज्यघटना हीच समान तत्वावर आधारलेली आहे. महात्मा जोतिबा फुले व डॉ. आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळेच आजची स्त्री सर्व क्षेत्रात पुरूषांच्या बरोबरीने व पुरूषांच्या खांदयाला खांदा लावून सर्वत्र वावरत आहे.

राजकिय दृष्टया स्वतंत्र झालेल्या भारतात एक नवा कालखंड सुरू झाल्यावर स्त्रियांच्या शिक्षणातील प्रगतीने खरा वेग घेतला. शिक्षणामुळे तिच्यामध्ये आत्मविश्वास व कर्तृत्वशक्तीची जाणीव निर्माण झाली. शिक्षणामुळे स्त्री स्वतःच्या पायावर उभी राहीली, व नवनविन कायदयामुळे आज सर्व हक्क मिळवत आहे. त्यामुळे अनेक क्षेत्रात स्त्रीयांचा विकास होत आहे. परंतु भारताच्या एकूण लोकसंख्येत ५० टक्के स्त्रीया असतांना त्या तुलनेत स्त्रियांचा विकास झालेला नाही. ग्रामीण समाजातील स्त्रीयांची स्थिती फारसी सुधारलेली दिसून येत नाही. अलिकडे राजकारणात स्त्रियांना आरक्षण मिंळाल्यामुळे अनेक स्त्रीया राजकारण व समाजकारणात सहभागी झालेल्या आहेत.

**महिला सक्षमीकरणाचा अर्थ :**

आजची शिक्षीत उच्चशिक्षीत स्त्री आपले कुटूंब सांभाळून कला, विज्ञान, साहित्य, अभिनय, क्रिडा, शिक्षण, संरक्षण, राजकारण अशा सर्वच क्षेत्रात उंच भरारी मारत आहे. पण ग्रामीण समाजातील स्त्रीयांची स्थिती फारच दयनिय आहे. ''रांधा, वाढा व उष्टी काढा'' अशा प्रकारची अवस्था आहे. म्हणून अशा स्त्रीयांना मानसिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकिय दृष्टीने सक्षम बनविण्याची नितांत गरज आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य आयोगाच्या माजी अध्यक्षा अॅड. निर्मला सामंत प्रभावळकर असे म्हणतात, ''स्त्रीयांचे सक्षमीकरण म्हणजे चुल व मुल या पारंपारिक भुमिकेतून व चक्रातून बाहेर काढून ती स्त्री एक व्यक्ती व माणूस आहे. तिला सुध्दा तिच्या व्यक्तीमत्वाचा ठसा उमटावयाचा आहे. हे लक्षात घेऊन त्यासाठी तिला संधी देणे आवश्यक आहे. कारण स्त्रीया हजारो वर्षापासून उपेक्षित राहिलेल्या आहे. त्यांना सामाजिक न्याय व प्रतिष्ठा देणे हे कोणत्याही लोकशाही शासनाचे कर्तव्य आहे.''

महिला सक्षम होणे म्हणजे तिच्या व्यक्तीमत्वाचा विकास होणे होय. यासाठी तिला शैक्षणिक दृष्टया व आर्थिक दृष्टया सक्षम करणे आवश्यक आहे. महिलांना म्हणजेच मुलीना शिक्षणापासून दुर ठेवणे हे ठिक नाही. आजही समाजात लिंगभेद केला जात आहे. त्यातून स्त्री भृणहत्येची समस्या निर्माण होऊन समाजावर यांचा फार वाईट परिणाम होत आहे. स्त्री अत्याचाराच्या घटनेत सुध्दा दिवसेंदिवस वाढ होतच आहे, या सर्व गोष्टीचा परिणाम मानवी समाजावर कळत नकळत पडत आहे. म्हणून महिलांना शिक्षण, उच्चशिक्षण देऊन तिला सक्षम बनवून अत्याचाराच्या विरोधात खंबिरपणे उभ करणे आवश्यक आहे.

महिला सक्षमीकरणाचा अर्थ म्हणजे स्त्रीयांमधील दुर्बलता नष्ट करणारी, तिचे शरीर, मन, बुध्दीत, स्वत्वाची जाणिव व स्वतः बद्दल जागरूकता निर्माण करून त्या दृष्टीने स्वयंम विकासासाठी प्रवृत्त करणारी संकल्पना होय. सक्षमीकरणाचा अर्थ आर्थिक दृष्टया स्वयं निर्भर किंवा स्वावलंबी होणे होय.राजकारणात स्त्रियांच्या सक्रिय सहभागाचे स्वप्न व निर्णय निर्धारणात अंतर्भावाचा विचार प्रत्यक्षात



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist- Gadchiroli

येण्यास सुरूवात झाली. परंतु महिलांना संसदेत ३३ टक्के आरक्षण देऊ अशी घोषणाच झाली विविध राजकीय पक्ष आपल्याकडे सक्षम महिला उमेदवार नाही अशी बतावणी करूण महिलांना योग्य त्या प्रमाणात उमेदवारी देणे टाळत आहेत.

१९९३ ला ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीने गाव पातळीवरील मध्यम व कनिष्ठ स्तरातील सर्वागिण विकासात भागीदारी करण्याचा स्त्रियांचा मार्ग मोकळा झाला. स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायती राज मध्ये ३३ टक्के आरक्षण महिलांना या पदावर देण्यात आले आहे. त्यामुळे मोठे सामाजिक परिवर्तन घडून आले. चार भितींच्या आत बंदिस्त असलेल्या चूल व मूल इतकेच कार्यक्षेत्र असलेल्या महिला पुरूषप्रधान असलेल्या राजकारणात आल्या आहेत. आज राजकीय क्षेत्रातील आरक्षित नसलेल्या जागेवर महिला निवडणूक लढवित आहेत, व जिंकत सुध्दा आहेत.

आरक्षणामुळे विविध राजकीय पक्षांना महिलांची कधी नव्हे ती इतक्या मोठया प्रमाणात गरज भासत आहे. त्यामुळे प्रत्येक पक्ष मोठया प्रमाणात पक्ष संघटनेत महिलांना सहभागी करून घेत आहे. समाजातील सक्षम महिलांचा शोध घेऊन पक्षाचे वेगवेगळे स्तरातील पदाधिकारी म्हणून स्थान देत आहे. काही पक्षांनी महिला आघाडी सुरू केलेल्या आहे. राजकीय पुरूषाप्रमाणे राजकीय महिलांचा एक वर्ग आरक्षणांच्या माध्यमातुन निर्माण झालेला आहे. त्यामुळे राजकीय स्त्री ही नविन संकल्पना रूढ झालेली आहे.

राजकीय विचारांचे संशोधक मॅक्झिन मोलिनॉक्स असे म्हणतात की, ''राजकारण ही पुरूषांची मक्तेदारी राहीली आहे. इतर क्षेत्राच्या तुलनेत राजकारणात सत्ता व अधिकार यांचे केंद्रिकरण अधिक आहे. जगात सर्वत्र राजकीय सत्तेत महिलांना कमी प्रतिनिधीत्व आहे.यांचे मुळ कारण राजकीय प्रभावासाठी आवश्यक असणारे सर्व निकष एकजात पुरूषी आहे. आरक्षणामुळे महिलांना संधी मिळाली, तरी पण सर्वोच्च प्रक्रियेतील राजकारणात महिलांचे प्रमाण कमीच आहे. ''

महिलांचे सक्षमीकरण होण्यासाठी त्यांना राजकारणात जास्त प्रमाणात स्थान मिळणे आवश्यक आहे. यासंदर्भात प्रा.सुरेंद्र सिंग व प्रा.एस.पी.श्रीवास्तव असे म्हणतात, ''राजकीय स्तरावर निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढल्यास व पुरूषांप्रमाणे झाल्यास राजकारणाला नविन दृष्टी मिळेल. त्यामुळे राजकारणात संस्थात्मक बदल घडून येईल. यासाठी समाजाची व राजकारणाची दिशा बदलविण्यास महिलांचा क्रियाशिल राजकारणातील सहभाग वाढविणे आवश्यक आहे.''

**महिलांचा राजकारणातील सहभाग :**

सक्षम महिला आणि राजकारण यांचा फार जवळचा संबंध आहे. काही महिलांनी आपल्या कर्तृत्वाच्या आधारावर भारतामध्येच नव्हेतर इतर पाश्चात्य देशांमध्ये आपल्या कार्यशैलीच्या आधारे वेगळी छाप पाडली. यामध्ये भुतपुर्व प्रधानमंत्री स्व. इंदिराजी गांधी, माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, माजी लोकसभा अध्यक्षा श्रीमती मिराकुमार पासून आजच्या लोकसभा अध्यक्षा सुमित्रा महाजन, केंद्रीय संरक्षण मंत्री निर्मला सितारमन, केंद्रीय परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज, केंद्रीयमंत्री स्मृती इराणी राज्यपाल किरण बेदी, पं. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, संपुआ माजी अध्यक्षा सोनिया गांधी, बहुजन समाज पार्टी अध्यक्षा मायावतीजी, मनेका गांधीजी, राज्यपाल आनंदीबैन, नुकतीच राजकारणात पदार्पण केलेली प्रियंका गांधी, सानिया मिर्झा, अरूंधती रॉय, पंकजाताई मुंडे, निलम गोऱ्हे याप्रमाणे अनेक महिला लोकसभा, राज्यसभा खासदार व विधानसभा, विधानपरिषद आमदार, जिल्हा परिषद अध्यक्षा, महानगरपालिकेत महापौर, नगरपालिका, नगरपरिषद अध्यक्षा, ग्रामपंचायत सरपंच व सदस्य म्हणून सक्षमपणे कार्य करीत आहे. याचबरोबर अनेक स्त्रिया नोकरीच्या क्षेत्रात सुध्दा सक्षमपणे शाळा, महाविद्यालयात ज्ञानार्जन देणाचे कार्य करीत आहेत. कार्यालयात व प्रशासनात महत्वाची भुमिका पार पाडत आहेत. एवढेच नव्हेतर एअरफोर्स, नेव्ही, आर्मीमध्ये भरती होऊन दहशतवादाचा सामना करण्याठी अहोरात्र लढत आहे. अशा विर महिलांचे कौतूक करावे तेवढे कमीच आहे. पोलीस दलात सामील होऊन समाजाच्या संरक्षणात त्या आघाडीवर आहेत.

**निष्कर्ष :**

महिलांचा राजकीय क्षेत्रातील सहभाग लक्षात घेतला असता ग्रामपंचायती पासून संसद भवनापर्यंत महिलांना आरक्षण मिळालेला आहे. तरी पण महिलांविषयी राजकीय नेत्याच्या मनात संकुचित विचार आहेत. त्यामुळे राजकारणात महिलांनी संघटित होऊन स्त्री ही स्त्रियांची वैरी नसून ती सखी आहे. हया उक्तीप्रमाणे कार्य केल्यास राजकीय क्षेत्रात त्यांचे स्थान बळकट होईल व महिलांचा दर्जा उंचावेल. महिलांच्या राजकीय सहभागाने त्यांच्या कौटुंबिक व सामाजिक दर्जा व भुमिकेत बदल घडून आलेला आहे. कौटुंबिक संबंधात सकारात्मक प्रभाव पडला आहे. महिलांचे प्रश्न व विकासाबाबत महिला राजकारणी जागृत असून महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. महिलांच्या राजकीय सहभागामुळे राजकीय महिलांबरोबर इतर महिलांमध्ये सुध्दा आत्मविश्वास निर्माण होत आहे. महिला कल्याणाचे निर्णय घेत आहे. सभागृहात विविध प्रश्नांवर आवाज उठवित आहे. सभागृहाच्या कामकाजात सक्रिय सहभाग घेवून बालीका, वृध्द स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात आवाज उठवित आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था व पंचायतराज मधील राजकीय आरक्षणाचे धोरण महिलांचे सक्षमीकरण करण्यास महत्वाचे आधार ठरत आहे. महिला आरक्षण धोरण महिलांच्या संपूर्ण व्यक्तीमत्व विकासासाठी आणि महिलां सक्षमीकरणासाठी सकारात्मक ठरत आहे.

**संदर्भ सूची :**

१. डॉ.लांजेवार ज्योती .......... भारतीय समाज आणि स्त्री, सुगावा प्रकाशन,पुणे
२. अॅड. बांगडे विजया.........महिला सबलीकरण सोपान, हरिवंश प्रकाशन, चंद्रपूर
३. डॉ. गोटे शुभांगी.....स्त्री परिवर्तनाची आव्हाणे, साऊथ एशियन सोशल रिसर्च पब्लीकेशन
४. नटराजन जयंती........आरक्षणाने महिलांचे सबलीकरण शक्य (लेख) दैनिक वर्तमानपत्र लोकमत, दि.१४ ऑक्टोंबर २००९
५. कुलकर्णी चारूशिला .........नेतृत्वक्षम महिलांना संसदेची आस, दैनिक वर्तमानपत्र लोकसत्ता, दि. २६ सप्टेंबर २००९



Adarsh Arts & Commerce College Desaiganj
PRINCIPAL
Adarsh Arts & Commerce College,
Desaiganj (Wadsa) Dist.- Gadchiroli